# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१६०/२०१० मधील निशाणी क्र.१४८ वर आदेश

**CNRNO.MHLA110006952010.**

०१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने पुरावा बंदचा आदेश बाजुस सारुन अतिरिक्त पुरावा दाखल करण्यास परवानगी देण्याकरिता दाखल केला आहे. सदर अर्जाला वादींनी म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला असुन सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने केवळ प्रकरण लांबविण्याकरिता दाखल केल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रकरणातील कागदपत्रांवरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी मिळकतींच्या वाटपाकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरण अंतिम युक्तिवादाकरिता प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेला आहे. तसेच सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.१ ला वेळोवेळी अतिरीक्त पुरावा दाखल करण्यास पुरेसी संधी देऊन देखील प्रतिवादी क्र.१ ने अतिरीक्त पुरावा न दिल्यामुळे प्रतिवादी क्र.१ चा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरण सन २०१० पासुन म्हणजेच दहा वर्षापेक्षा जास्ती कालावधीपासुन प्रलंबित असल्यामुळे लवकरात लवकर निकाली काढणे आवश्यक आहे. सदर अर्जातील कथनाच्या पृष्ठर्थ प्रतिवादी क्र.१ ने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे केवळ नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे निराकरण गुण–

दोषावर होणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रतिवादी क्र.१ ला कैफियतीमधील कथनाच्या अनुषंगाने पुरावा दाखल करण्यास संधी देणे न्यायोचित होणार आहे.

०३. तसेच सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास होणारा विलंब देखील खर्चाच्या स्वरुपात भरुन काढणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रकरणाचा प्रलंबित कालावधी व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेउन माझे असे मत झाले आहे की, सदर प्रतिवादी क्र.१ ला अतिरीक्त पुरावा दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ वर खर्च बसवुन मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. नि.क्र.१४८ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ वर रक्कम रु.५००/– खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ने वादींना पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.03.06 16:47:33 +0530

(शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर
निलंगा.

दि.०६.०३.२०२०.